# जाहिरात

## शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित

**(महाराष्ट्र शासनाच्या संपूर्ण मालकीची कंपनी)**

**CIN No. : 70200MH1998SGC116664**

५ वा माळा, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पू), मुंबई - ४०० ०५१

**दुरध्वनी क्र. २६५९०५८८/ २६५९१०८७/ २६५९१९८९ फॅक्स: २६५९०५८६**

**ई-मेल :**sppl_mumbai@rediffmail.com **वेबसाईट:**www.sppl.biz

क्रमांक:आस्था/नियुक्ती/प्र.क्र.८१/२०१८ दिनांक: २१ जानेवारी, २०१९.

**शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितच्या कार्यालयात (अ) ' कनिष्ठ अभियंता ' (ब) प्रशासकीय स्वरुपाच्या कामाकरीता कनिष्ठ सहाय्यक / वरीष्ठ लिपिक आणि (क) लेखापाल या तिन्ही कामांकरीता निव्वळ कंत्राटी तत्वावर ११ महिन्यांकरीता नियुक्ती.**

झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प व परवडणाऱ्या घरांचे प्रकल्प संबंधित कामाकरीता शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितच्या कार्यालयात खालील अटींची पूर्तता करणाऱ्या ' (अ) ' , ' (ब) ' आणि ' (क) ' प्रमाणे व्यक्तींची ११ महिन्यांसाठी निव्वळ कंत्राटी तत्वावर व एकत्रित ठोक वेतनावर मुलाखतीने निवड करुन नियुक्ती करावयाची आहे.

(अ) कनिष्ठ अभियंता : मुंबई महानगर प्रदेश परिक्षेत्रात किमान १ वर्षाचा अनुभव असलेल्या १ ' कनिष्ठ अभियंता ' यांची स्थापत्य शाखेतील कामासाठी आवश्यकता आहे. सदर पदाकरीता उमेदवार स्थापत्य शाखेतील मान्यताप्राप्त विद्यापीठाची किमान पदविका धारण केलेला असावा.

(ब) कनिष्ठ सहाय्यक / वरीष्ठ लिपिक : शासन सेवा/ स्थानिक स्वराज्य संस्था / सार्वजनिक उपक्रम / प्राधिकरणे / मंडळे / महामंडळे यातील सहाव्या वेतन आयोगाच्या रु.५२००-२०३०० व ग्रेड पे रु.२८०० / रु.९३००-३४८०० व ग्रेड पे रु.४८०० दर्जाच्या पदावरील प्रकल्पांच्या प्रकरणांचे ' टिप्पणी लेखन आणि पत्रव्यवहाराच्या ' कामाचा किमान १ वर्षांचा अनुभव असलेल्या २ व्यक्तींची प्रशासकीय कामाकरीता आवश्यकता आहे. सदर कामाकरीता उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाची किमान पदवी धारण केलेला असावा. आणि

(क) लेखापाल (अकाऊंटंट) : मान्यताप्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेची किमान पदवी धारण केल्यानंतरचा ' टॅली ' (Tally) ॲप्लीकेशनमध्ये स्वतंत्रपणे प्रत्यक्ष नोंदी करण्याचा किमान १ वर्षाचा मान्यताप्राप्त आस्थापनेत काम केल्याचा अनुभव धारण केलेल्या व्यक्तीची आवश्यकता आहे.

१. उपरोक्त तिन्ही स्वरुपाच्या कंत्राटी नेमणूकीकरीता उमेदवाराचे वय दि.१ जानेवारी, २०१९ रोजी १९ वर्षापेक्षा कमी नसावे व ६५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

२. सदर कंत्राटी नेमणूका ११ महिन्यानंतर संपुष्टात आणण्यात येतील. भविष्यातील परिस्थितीनुसार आवश्यकता भासल्यास त्यांची पुन्हा फक्त ११ महिन्यांकरीता कंत्राटी नेमणूक करण्याचा विचार होऊ शकेल, तथापि सदर नियुक्त्या कायम अथवा नियमित स्वरुपाच्या नाहीत.

३. उपरोक्त तिन्ही स्वरुपाच्या पदांच्या बाबतीत शासकीय सेवेतून / स्थानिक स्वराज्य संस्थेतून / सार्वजनिक उपक्रमातून निवृत्त झालेल्यांची निवड व नियुक्ती झाल्यास त्यांना ' त्यांच्या नियुक्ती वेळच्या अंतीम वेतनातून ' निवृत्ती वेतन ' अथवा ' संभाव्य निवृत्ती वेतन ' वजा करुन तितके ' एकत्रित वेतन ' म्हणून देण्यात येईल. तथापि इतर कोणतेही भत्ते देय व अनुज्ञेय राहणार नाहीत. इतर व्यक्तींची निवड झाल्यास सहाव्या वेतन आयोगाच्या उपरोक्त पदांच्या वेतनश्रेणीच्या किमान टप्प्यानुसार निश्चित होणारे मूळ वेतन + ग्रेड पे + महागाई भत्ता + घरभाडे भत्ता इतकी रक्कम ' एकत्रित ठोक वेतन ' म्हणून देण्यात येईल. त्यानुसार एकत्रित रक्कम साधारणत: (अ) कनिष्ठ अभियंता आणि (क) लेखापाल पदाच्या बाबतीत रु.३६,९९२/- असेल. वरील (ब) येथील प्रशासकीय स्वरुपाच्या पदांच्या बाबतीत निवड होणाऱ्या उमेदवाराच्या अनुभवानुसार एकत्रित ठोक रक्कम साधारणत: रु.२१,७६०/- अथवा रु.३८,३५१/- इतकी असेल. इतर कोणतेही भत्ते देय व अनुज्ञेय राहणार नाहीत.

इच्छुक उमेदवारांनी स्वत:च्या संपूर्ण माहितीच्या अर्जासह उपरोक्त पत्त्यावरील कार्यालयात वॉक-इन स्वरुपाच्या मुलाखतीने निवडीसाठी दि.४ किंवा ५ फेब्रुवारी, २०१९ यापैकी कोणत्याही दिवशी दुपारी ३ ते ५ या वेळेत उपस्थित रहावे.

२१/०१/२०१९

दिनांक: २१ जानेवारी, २०१९ व्यवस्थापक (प्रशासन)

ठिकाण: मुंबई. शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित